**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील राज्यमार्गालगत महिला प्रवाशांसाठी प्रसाधनगृह व सर्वसामान्य प्रवाशांसाठी “जनसुविधा केंद्र” बांधणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र. ११०/नियो-१ अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मदाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u> : शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र.५७/नियोजन-१ अ, दि. २२ जून,२०१६

**शासन परिपत्रक**

<u>**प्रस्तावना :**</u>

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील राज्यमार्गालगत महिला प्रवाशांसाठी प्रसाधनगृह व सर्वसामान्य प्रवाशांसाठी जनसुविधा केंद्र बांधण्यासंदर्भात संदर्भाधिन दि. २२.०६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. दरम्यान दि. ०४.१०.२०१७ रोजी १. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड IOCL २. हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड HPCL आणि ३. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड BPCL या ऑईल कंपन्यांशी राज्यमार्गा लगत जनसुविधा केंद्रे बांधण्यासंदर्भात सामंजस्य करार (MOU) करण्यात आला आहे. आगामी काळात राज्य मार्गावरुन प्रवास करणाऱ्या महिलांना स्वच्छतागृहाच्या सोई उपलब्ध व्हाव्यात म्हणून अद्ययावत स्वरुपाची जनसुविधा केंद्रे बांधण्याचा शासनाचा मानस आहे. त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

राज्यमार्गा लगत जनसुविधा केंद्रांचे जाळे उभारण्याच्या दृष्टीने पुढील टप्पा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित नसलेल्या परंतु राज्य शासनाच्या मालकीच्या रस्त्यालगतच्या जागांवर प्रसाधनगृहे बांधण्याचे शासनाने ठरविले आहे. या अनुषंगाने सर्व सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागातील सहाय्यक मुख्य अभियंत्यांना “प्रादेशिक समन्वय अधिकारी” व सर्व सार्वजनिक बांधकाम मंडळातील सहाय्यक अधिक्षक अभियंत्यांना त्यांच्या अधिनस्त जिल्हयाकरीता “जिल्हा समन्वय अधिकारी” म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. या अनुषंगाने सर्व सहाय्यक अधिक्षक अभियंत्यांनी त्यांच्या जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात प्रमुख जिल्हा मार्ग व राज्यमार्गांची पहाणी करावी व रस्त्यालगत जिथे महसूल विभागाची जागा उपलब्ध आहे अशा जागांची (कमीत कमी २ एकर) माहिती महसूल विभागाकडून घेऊन तसेच ज्या ठिकाणी महसूल विभागाची जागा उपलब्ध नाही, अशा ठिकाणी भूसंपादनाचा प्रस्ताव संबंधीत मुख्य अभियंत्यांकडे

१ महिन्याच्या आत सादर करावा. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० कि.मी. साठी १ या प्रमाणे जागा उपलब्धतेची पडताळणी करावी. त्यानंतर सर्व मुख्य अभियंत्यांनी सहाय्यक अधिक्षक अभियंत्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करावा. ही संपूर्ण कार्यवाही दि. ३१ डिसेंबर,२०१७ पूर्वी पूर्ण करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७११२७१२२५४१४८१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Vinayakrao Patil

Digitally signed by Prashant Vinayakrao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2b1bad66664b1e11e3bf66db1d526143e814db5f8c505422af66a5628314537e, cn=Prashant Vinayakrao Patil
Date: 2017.11.27 12:35:55 +05'30'

**( प्रशांत पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मंत्री (सा.बां.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (सा.बां.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (रस्ते),यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई
५. सचिव (बांधकामे), यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई
६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, सर्व
७. उप सचिव (रस्ते), यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई
८. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सर्व
९. सहाय्यक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, सर्व
१०. सहाय्यक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सर्व
११. निवडनस्ती, नियोजन-१अ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई